# Pimpri Chinchwad Police Commissionerate

प्रेस नोट ता.१२/०३/२०२०

## खुन, खंडणी, अपहरण व गंभीर दुःखापतींचे गुन्हे दाखल असलेल्या कुख्यात आरोपी सह त्याचे साथीदाराला अटक करुन दोन पिस्टल व जिवंत काडतुस जप्त

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक ११/०३/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट २ कडून शिवजयंती मिरवणुक व सण उत्सवांचे अनुषंगाने रेकॉर्डवरील गुन्हेगार चेकींगची व्यापक मोहीम राबविण्यात येत असतांना पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार व पोलीस हवालदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, खुन, खंडणी, अपहरण व गंभीर दु:खापतीचे गुन्हे दाखल असलेला पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार मंगेश नामदेव पालवे वय २९ वर्षे रा.मुळ रिहे मोरेवाडी ता.मुळशी जि. पुणे सध्या द्वारका सिटी म्हाळुंगे चाकण हा घातपाताचा गुन्हा करण्याच्या उदेशाने पिंपरी भागात येणार असल्याची बातमी मिळालेने केएसबी चौक ते चिंचवड स्टेशन रोडवर सापळा लावुन त्यास देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस सह पकडण्यात आले. त्याचप्रमाणे इसम नामे अमोल अशोक भेगडे वय ३० वर्षे, रा.घोटवडे ता.मुळशी जि.पुणे हा त्याचेकडे देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस बाळगुन असल्याची व तो चिंचवड परिसरात येणार असल्याची माहीती मिळालेने जुना जकात नाका चिंचवड परिसरात सापळा लावुन देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतूस सह पकडण्यात आले. अटक आरोपीत यांचे विरुध्द पिंपरी व चिंचवड पोलीस ठाणेकडे भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) , २७ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढील तपास गुन्हे शाखा युनिट २ कडून करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेकींग मोहीम राबवित असतांना तडीपार आरोपीत नामे विशाल बबन गायकवाड वय २४ वर्षे रा.बौध्दनगर पिंपरी हा त्यास पुणे जिल्हयातुन दोन वर्ष मुदती करीता तडीपार केले असतांना तडीपार आदेशाचा भंग करून मिळुन आलेने त्याचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संयज निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, संपत निकम,संजय पंधरे, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, प्रमोद वेताळ, दिपक खरात, मपोहवा उषा दळे, विपुल जाधव,चेतन मुंढे, जमीर तांबोळी, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,नामदेव राऊत,नामदेव कापसे यांचे पथकाने केली आहे.

(शैलेश गायकवाड)
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट-२
पिंपरी चिंचवड शहर

Scanned with